








रयत शिक्षण संस्थेचे

छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा

डॉ.आर.आर.साळुंखे

सहयोगी प्राध्यापक व भूगोल विभाग प्रमुख





# Module: 1 मानवी भूगोलाची ओळख (Introductin to Human Geography)





1.1 मानवी भूगोलाच्या व्याख्या (Definition of Human Geography)

1.2 मानवी भूगोलाचे स्वरूप व व्याप्ती (Nature & Scope of Human Geography)

1.3 मानवी भूगोलाच्या शाखा (Branches of Human Geography)

1.4 मानवी भूगोलाच्या मुलभूत संकप्लना (Basic Concept of Human Geography)

1 निश्चयवाद (Determinisim) 2. संभववाद (Possibilism ) व

3.नव निश्चयवाद (Neo-determinism)



# Module: 1 मानवी भूगोलाची ओळख
# (Introductin to Human Geography)

## प्रस्तावना (Introduction):

- मानवी भूगोल ही भूगोलाची एक प्रमुख व महत्त्वाची शाखा
- फेड्रिक रॅटझेल – या जर्मन भूगोलतज्ञाने **मानववंशशास्त्रभूगोल** (Antropogeography) हा ग्रंथ १८८२ मध्ये लिहिला.
- या ग्रंथामध्ये पहिल्यांदा मानवाच्या अध्ययनाला सुरवात
- फेड्रिक रॅटझेल- मानवी भूगोलाचे जनक (Father of Human Geography)
- भूगोलाच्या अभ्यासात मानवाला केंद्र स्थानी मानून विविध मानवी क्रिया-प्रक्रियांचा अभ्यास केला जातो.
- मानवी भूगोलाच्या विकासात योगदान :


फेड्रिक रॅटझेल बरोबर विडाल–डी-ला–ब्लाश, दिमाँजिऑ, हंटींगटन, जीन ब्रून्स,अल्बर्ट, मॅक्स मीलीयन, साँयर

# 1.1 मानवी भूगोलाच्या व्याख्या (Definition of Human Geography):

1. **कु.एलेन सेम्पल** (**भौगोलिक पर्यावरणाचा प्रभाव-1911**):

मानवी भूगोल म्हणजे अस्थिर पृथ्वी व क्रियाशील मानव यांच्यातील बदलत्या संबंधाचा अभ्यास होय.

२. **फेड्रिक रॅटझेल**(**मानववंशशास्त्राभूगोल /Anthropogeography -१८८२**):




मानवी भूगोलातील सर्व घटना दृश्ये ही भौगोलिक वातावरणाशी संबंधित असतात व तो एक भौतिक स्थितीचा मिलाप असतो.

३. **विडाल-डी-ला-ब्लाश**(**मानवी भूगोल -१९२३**):

सांस्कृतिक भूदृश्य व नैसर्गिक भूदृश्य यांच्या एकात्मतेचा अभ्यास म्हणजे मानवी भूगोल होय.

४. **एल्सवर्थ हंटींगटन** (**मानवी भूगोलाची मूलतत्त्वे-१९२०**):

मानवी भूगोल म्हणजे भौगोलिक पर्यावरण, मानवी क्रिया व गुण यांच्या पारस्पारिक संबंधाचे स्वरूप व वितरण यांचे अध्ययन होय.

**५. जीन ब्रुन्स (मानवी भूगोल कार्यात्मक वर्गीकरण-१९१०):**

मानवी क्रिया व प्राकृतिक भूगोलाची दृश्ये यांच्यातील संबंधाचा अभ्यास करणे हा मानवी भूगोलाचा हेतू व उद्देश आहे.

**६. दिमाँजिऑ(मानवी भूगोलाच्या समस्या-१९४२):**

मानवी भूगोल हे मानव समूह व समाज यांचे नैसर्गिक पर्यावरणाशी असणाऱ्या संबंधाचा अभ्यास करणारा विषय आहे.

**7. व्हाईट व रेनर(समाजाचा परिस्थितिकिय अभ्यास -१९४८):**

मानवी भूगोलात पृथ्वीच्या पृष्ठभागाला अनुसरून मानवी समाज्याचे अध्ययन केले जाते.

**८. डेव्हिस (1948):**

मानवी भूगोल म्हणजे नैसर्गिक पर्यावरण व मानवी क्रिया यांच्यातील संबांधाचे फक्त अध्ययन नसून त्यात पृथ्वीतलावरील प्रदेशांचे देखील अध्ययन केले जाते.

**९. लेबॉन:**

मानव व पर्यावरणाशी संबंधित समस्यांचा अभ्यास म्हणजे मानवी भूगोल होय.

**१०. मार्क जेफरसन:**

एखाद्या प्रदेशातील मानवी समुहाने उभारलेले सांस्कृतिक पर्यावरण व त्या प्रदेशातील परिस्थितीजन्य घटनादृश्य यांचा तौलनिक अभ्यास म्हणजे मानवी भूगोल होय.

**११. प्रोफेसर रॉक्सबी:**

विविध मानवी समाजाकडून त्यांच्या भौगोलिक घटकाशी केलेले समायोजन, विविध प्रदेशामध्ये आलेल्या अनुभवावरून मानवाने काढलेले Conclusion यांचा व विविध प्रदेशाप्रदेशामधील परस्पर संबंधाचा अभ्यास म्हणजे मानवी भूगोल होय.

**थोडक्यात,**

मानवी भूगोल म्हणजे पृथ्वीवरील विभिन्न प्रदेशातील वास्तव्य करणाऱ्या मानवी समूहाच्या जीवन पद्धतीचा पर्यावरणीय घटकांच्या अनुषंगाने घेतलेला आढावा होय.

# मानवी भूगोलाचे स्वरूप (Nature of Human Geography):

## १. वर्णनात्मक स्वरूप (Descriptive Nature):

- सुरवातीच्या काळात मानवी भूगोलाचे स्वरूप वर्णनात्मक होते.
- What & where ?
- प्रवास वर्णन –मानवी जीवनाची माहिती उदा. हंबोल्ट, बोमन, एल्सवर्थ हंटींगटन

## २. वितरणात्मक स्वरूप (Distributional Nature):

- भूगोल हे वितरणाचे शास्त्र आहे.
- प्रादेशिक विविधतेचा अभ्यास हा भूगोलाचा आत्मा आहे.
- मानव निर्मित सांस्कृतिक पर्यावरणातील विविध घटकांचे प्रादेशिक वितरणाचा अभ्यास

## ३. शास्त्रीय किंवा वैज्ञानिक स्वरूप (Scientific Nature):

- १८ व्या शतकानंतर भूगोलाच्या अभ्यासामध्ये अमुलाग्र बदल
- कार्य –कारण –भाव संबंधाचा अभ्यास (Cause and effect relationship)
- What, Where, Why & how?
- नियम, सिद्धांत, प्रतिमाने यांची निर्मिती उदा.माल्थस, व्हॉन थुनेन, Walter Christlar, E.W.Barjes

## ४. उपयोजित स्वरूप (Applied Nature):

- २० व्या शतकाच्या पूर्वार्धात मानवी भूगोलाला उपयोजित स्वरूप प्राप्त झाले.
- प्रादेशिक सर्वेक्षण, प्रादेशीकरण व प्रादेशिक नियोजन यामध्ये मानवी भूगोलातील अनेक संकल्पना प्रत्यक्ष राबविल्या जाऊ लागल्या.
- भूराजनीतीमध्ये मानवी भूगोलाचा वापर उदा. हालफोर्ड मॅंकिंडर

## ५. परिवर्तनशील किंवा गतिशील स्वरूप (Dynamic Nature):

- एखाद्या शुष्क प्रदेशात सिंचन काढला तर तेथिल सर्व शेती बागायती होते

यामुळे तेथील मानवी भूगोल बदलतो आणि या बदलाचा अभ्यास मानवी भूगोलात केला जातो.

- स्थल-काळ सापेक्ष बदल होत आहेत.

## ६. आंतरविद्याशाखीय स्वरूप (Interdisciplinary Nature):

- जीवशास्त्र, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, समाजशास्त्र, मानसशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास इ. ज्ञान शाखा मानवी भूगोलाशी संबंधित आहेत.
- मानवी भूगोल नै.शास्त्रे व सामाजिक शास्त्रे यांच्यात समन्वय राखण्याचे काम करते.
- अलीकडच्या काळात या विषयाचे स्वरूप हे आंतरविद्याशाखीय आहे.

# मानवी भूगोलाची व्याप्ती (Scope of Human Geography):

- कोणत्याही विषयाची व्याप्ती / विषय क्षेत्र म्हणजे त्या विषयाचा समग्र / सखोल in detail अभ्यास होय.
- मानवी भूगोलात मानव आणि निसर्ग यांच्यातील परस्पर संबंधाचा अभ्यास केला जातो.
- **जी.टी.त्रीवार्था, एल्सवर्थ हंटींगटन, जीन ब्रुन्स, विडाल-डी-ला-ब्लाश, दिमाँजिऑ, व्हाईट व रेनर, परपीलीओ**

इत्यादी. भूगोल तज्ञांनी मानवी भूगोलाची व्याप्ती निश्चित करण्याचा प्रयत्न केला.

**मानवी भूगोलाची व्याप्ती खालील ३ गटात विभागली आहे.**

## १.नैसर्गिक पर्यावरण:

यामध्ये नै.घटकांचा समावेश होतो.

स्थान, भूपृष्ठरचना, हवामान, मृदा, वनस्पती, पाणी, प्राणी व खनिजे इ.घटकांचा समावेश होतो.

## २.सांस्कृतिक पर्यावरण:

बुद्धिवान व कार्यक्षम मानव नै. पर्यावरणातील विविध घटकांच्या आधारे सांस्कृतिक पर्यावरणाची निर्मिती करतो. यामध्ये वसाहती, शेती, उद्योग, वाहतूक, व्यापार, विज्ञान व तंत्रज्ञान या घटकांचा समावेश होतो.

## ३. नैसर्गिक पर्यावरण व सांस्कृतिक पर्यावरणातील आंतरक्रिया:

नैसर्गिक पर्यावरण व सांस्कृतिक पर्यावरणामध्ये सातत्याने विविध प्रक्रिया होत असतात.
उदा. भूरुपाचा हवामानावर, हवामानाचा मृदेवर, या सर्वांचा वनस्पती व प्राण्यावर परिणाम होतो.

## 4. इतर घटक –

लोकसंख्या-वाढ,घनता,वितरण,स्थलांतर, मानवी वंश, साधन संपत्ती, वाहतूक-दळण- वळण, मानवी वसाहती(ग्रामीण–नागरी),शेती,उद्योगधंदे, व्यापार,पर्यटन, मानवाचे विविध व्यवसाय, भूमिउपयोजन, विकास योजना, राजनीतिक प्रशासन इ. घटकांचा अभ्यास मानवी भूगोलाच्या केला जातो.

# १.३ मानवी भूगोलाच्या शाखा (Branches of Human Geography):

- **पर्यावरणाचा मानवावर होणारा परिणाम व मानवाचा पर्यावरणावर होणारा परिणाम अभ्यासणे** हा मानवी भूगोलाच्या अध्ययनाचा हेतू आहे.
- भूतलावरील विविध समाज, त्यांची संस्कृती, त्यांच्या परंपरा – रीतीरिवाजयांची माहिती होते.
- मानवी वर्तन, आर्थिक क्रिया, मानवाचे सामाजिक, राजकीय तसेच सांस्कृतिक जीवन, मानवाचा इतिहास इ. विविध घटकांची माहिती मानवी भूगोलाच्या अभ्यासातून होते.
- कोणत्याही विषयाची व्याप्ती विस्तृत होते तेंव्हा अभ्यास करावयास सोईचे व सुटसुटीत व्हावे तसेच सखोल अभ्यास करता यावा म्हणून त्यातील प्रयेक घटकाचा स्वतंत्र अभ्यास वेगवेगळ्या शाखात केला जातो.
- मानवी भूगोलाच्या प्रमुख ४ प्रमुख शाखा आहेत.

## १. ऐतिहासिक भूगोल (Historical Geography):

## २. राजकीय भूगोल (Political Geography)

१.सैनिकी भूगोल (Military Geography)

२.प्रशासन विषयक भूगोल (Administrative Geography)

३.निवडणूक विषयक भूगोल (Election Geography)

## ३. सामाजिक भूगोल (Social Geography)

१. लोकसंख्या भूगोल (Population Geography)

२. वसाहत भूगोल (Settlement Geography)

१.ग्रामीण वसाहतीचा भूगोल (Rural Settlement Geography)

२. नागरी वसाहतीचा भूगोल (Urban Geography)

३. गुन्हेगारीचा भूगोल (Geography of Crime)

४. कल्याणकारी भूगोल (Welfare Geography)

५. मानवतावादी भूगोल (Humanistic Geography)

६. वैद्यकीय भूगोल (Medical Geography)

७. धर्मविषयक भूगोल (Religious Geography)
८. भाषा विषयक भूगोल (Language Geography)
९. लिंग विषयक भूगोल (Gender Geography)
१०. अभियांत्रिकी भूगोल (Engineering Geography)
११. स्त्रीवादी भूगोल (Feministic Geogrphy)

## ४. आर्थिक भूगोल (Economic Geography)

१. साधन संपत्तीचा भूगोल (Geography of Resources)
२. व्यापारी भूगोल (Commercial Geography)
३. विपणन भूगोल (Marketing Geography)
४. कृषि भूगोल (Agricultural Geography)
५. वाहतूक व दळण– वळण विषयक भूगोल (Transportation Geography)
६. औद्योगिक भूगोल (Industrial Geography)
७. पर्यटन भूगोल (Geography of Tourism)

# मानवी भूगोलाच्या अभ्यासाचे महत्त्व (Importance to the study of Human Geography):

- मानवी भूगोलाचे महत्त्व खालील मुद्द्यांच्या आधारे सांगता येईल.
    1) भूगोलाच्या विकासासाठी
    2) साधन संपत्तीचे ज्ञान
    3) आंतरसंबांधाचे ज्ञान
    4) भिन्नता समजावून घेण्यासाठी
    5) राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेच्या आखणीसाठी
    6) एकून मानवी जीवनाची माहिती
- मानवाच्या समस्या सोडविण्यासाठी मानवी भूगोलाच्या अभ्यासाचा मोठ्या प्रमाणात उपयोग होत आहे

मानवी भूगोलाच्या या वाढत्या महत्त्वामुळे सध्या हा विषय अधिक उपयोजित व आंतरविद्याशाखीय बनला आहे.


Thank you